MHRG040003362024

<u>**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०१/२०२४ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेसाठी दाखल केला आहे.

२) <u>**अर्जाचा सारांश**</u> – अर्जदार क्र. १ **श्रीमती. मीरा अविनाश काळे** वय – ७१ वर्षे, धंदा –- गृहिणी, अर्जदार क्र. २ **श्री. केतन अविनाश काळे**, वय – ३७ वर्षे, धंदा - नोकरी, दोघे रा. १०४, रिध्दी रिजेन्सी, भूखंड क्र. ७४६/५, साई नगर रोड, गोल्डन हॉर्वेस्ट हॉटेलच्या जवळ, ता. पनवेल, जि. रायगड, अर्जदार क्र. ३ **सौ. मेघना सिध्देश झारे उर्फ मेघना अविनाश काळे,** वय – ४२ वर्षे, धंदा – गृहिणी, रा. ५०१, वसंत अर्पित, विंग १, टिळक रोड, ता. पनवेल, जि. रायगड येथील रहिवासी असून अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील **कै. अविनाश बल्लाळ काळे** हे दि. १५/०९/२०२३ रोजी पुणे येथे मयत झाले आहेत. **कै. अविनाश बल्लाळ काळे** यांच्या आई कै. सरस्वती बल्लाळ काळे या दि. ३०/०९/१९८८ रोजी ठाणे येथे मयत झालेल्या आहेत. **कै. अविनाश बल्लाळ काळे** यांना मृत्यूसमयी बॉम्बे रेग्युलेशन कायद्याप्रमाणे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, अर्जदार यांच्याशिवाय त्यांना अन्य कोणतेही वारस नाहीत. तसेच त्यांनी त्यांचे हयातीत कोणतेही मृत्यूपत्र अथवा व्यवस्थापत्र अगर बक्षीसपत्र करुन ठेवलेले नाही. सबब, अर्जात नमूद कारणांसाठी अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी हा अर्ज केला आहे.

३) या अर्जाची जाहीर नोटीस (निशाणी ११) **दि. ११/१२/२०२५** च्या दैनिक 'किल्ले रायगड' या वृत्तपत्रातुन प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर अर्जाचा जाहीरनामा (निशाणी १४) **दि. ०३/०९/२०२५** व (निशाणी १२) **दि. २४/०६/२०२५** रोजी प्रसिध्द करण्यात आला होता. जाहीरनामा आणि जाहिर नोटीस प्रसिध्द करुन देखील अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्राच्या मागणीबाबत कोणीही हजर होवुन हरकत घेतलेली नाही.

४) या अर्जाच्या सिध्दतेसाठी अर्जदार यांनी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि. १३ वर दाखल केले आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र. ४ सोबत **कै. अविनाश बल्लाळ काळे** यांच्या

मृत्यूच्या दाखल्याची व्हेरीफाईड प्रत, कै. सरस्वती बल्लाळ काळे यांच्या मृत्यूदाखल्याची मुळ प्रत, दि. १७/०८/१९९० रोजीचे करारनाम्याची सर्टिफाईड प्रत, असेसमेंट उता-याची मुळ प्रत, ७/१२ उता-याची व्हेरीफाईड प्रत, बँकेचे खाते उता-याची डिजीटल प्रत, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधारकार्ड व पॅनकार्डची व्हेरीफाईड प्रत इ. कागदपत्रे दाखल केले आहेत.

५) त्यानंतर अर्जदारांनी निशाणी क्र. १९ वरील पुरशीस नुसार त्यांचा पुरावा बंद केला आहे. अर्जदार यांचा अर्ज व पुरावा आव्हान विरहित आहे. त्यांच्या पुराव्यातुन अर्जदार हेच **कै. अविनाश बल्लाळ काळे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. त्यामुळे **कै. अविनाश बल्लाळ काळे** यांचे मृत्युपश्चात मिळणारे लाभ मिळण्यास अर्जदार हक्कदार आहेत. येणेप्रमाणे अर्जदार यांना केवळ ते **कै. अविनाश बल्लाळ काळे** यांचे वारस म्हणून घोषित होत आहे. प्रस्तुत प्रकरण हे केवळ मयत व्यक्तिंचे वारस प्रमाणपत्र संबंधित आहे व त्याप्रमाणे केवळ ते वारस असल्याबाबत घोषणा प्रमाणपत्र दिले जात आहे. इतर कोणतेही अधिकाराचे घोषणापत्र दिले जात नाही. त्यामुळे अर्ज मंजुर करण्यास कोणतीही कायदेशीर अडचण अथवा बाधा नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिल्यानंतर अर्जदार क्र. १ **श्रीमती. मीरा अविनाश काळे,** अर्जदार क्र. २ **श्री. केतन अविनाश काळे**, अर्जदार क्र. ३ **सौ. मेघना सिध्देश झारे उर्फ मेघना अविनाश काळे** हे मयत **कै. अविनाश बल्लाळ काळे** यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यात यावे. |

UMA YASH BORADE KAPOOR
Digitally signed by UMA YASH BORADE KAPOOR
Date: 2026.03.10 13:34:27 +0530

**(उमा वाय. बोराडे-कपुर)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
पनवेल.

दि. १०.०३.२०२६